महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग

## माजी विद्यार्थी सत्कार आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

## अहवाल

आज सोमवार , दि. 26 ऑगस्ट 2024 रोजी राज्यशास्त्र विभागात (F-23) माजी विद्यार्थिनी कु. शुभांगी साठे हिची पोलिस उपनिरीक्षक पदी (P.S.I.) निवड झालेबद्दल सत्कार आणि 'स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी 'या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे प्रमुख पाहुणे मानसतज्ञ मा. अजित पाटील होते तर अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. के खडसे होते. यावेळी माजी विद्यार्थिनी कु. शुभांगी साठे हिची पोलिस उपनिरीक्षक पदी (P.S.I.) निवड झालेबद्दल विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. के. खडसे यांनी तिचा बुके आणि एक पुस्तक देऊन तिचा सत्कार केला. त्यानंतर माजी विद्यार्थिनी कु. शुभांगी साठे हिने स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अभ्यास कसा करावा, कोणते संदर्भ ग्रंथ वापरावेत, मुद्दे कसे तयार करावेत, विषय कसा समजून घ्यावा, दैनंदिन घडामोडींसाठी कोणते वर्तमानपत्र वाचावे, आपली दैनंदिनी कशी असावी याविषयी विस्ताराने मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले. प्रमुख पाहुणे मानसतज्ञ मा. अजित पाटील यांनी विद्यार्थिनीच्या यशाचे कौतुक करताना संयम आणि परिश्रम हे यशाचे गमक असल्याचे सांगितले. विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. के. खडसे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना तिच्या यशाबद्दल तिचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि पुढील काळात आमच्या विभागाच्या विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करीत राहावे अशी विनंतीही केली. यानंतर कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनीही कु. शुभांगी साठे हीचा सत्कार केला आणि शुभेच्छा दिल्या. यावेळी कला व वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता प्रा. एस. आर नांगरे, मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. घनश्याम कांबळे आणि प्रा. डॉ. अंगद पाटील उपस्थित होते.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal.Walwa, Dist.Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409




कु. शुभांगी साठे  मार्गदर्शन करताना




प्रा. डॉ. एस. के खडसे मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवर




कु. शुभांगी साठे मार्गदर्शन करताना




कु. शुभांगी साठे हिचा सत्कार करताना कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. नितीन शिंदे